# अमृतमय गुरुगाथा : खंड ३

# गुरु प.पू. भक्तराज महाराज यांच्या अखेरच्या आजारपणात घडलेली त्यांची सेवा

## (गुरुसेवेतील अनुभूती आणि गुरुंचे महानिर्वाण यांसह)

## विषयसूची


卐 सद्‌गुरु प.पू. भक्तराज महाराज यांचा संक्षिप्त परिचय ६

卐 लेखिकेचा परिचय ८

卐 मनोगत ९

卐 ‘संतांचे एखाद्याला शिव्या देणे किंवा ओरडणे’ या मागचा भावार्थ! ११


## अनुक्रमणिका


१. कर्मकांडाच्या पलीकडे नेणारे प.पू. भक्तराज महाराज ! १२

२. प.पू. भक्तराज महाराज यांचे बुद्धीअगम्य वागणे १२

३. प.पू. भक्तराज महाराज यांचे प्रकृती अस्वास्थ्य आणि त्या वेळी जाणवलेली सूत्रे ! १३

४. प.पू. भक्तराज महाराज यांच्या समवेत अनुभवलेले पन्हाळा येथील अविस्मरणीय वास्तव्य ! २२

५. प.पू. भक्तराज महाराज यांची कुडाळ येथे झालेली शेवटची गुरुपौर्णिमा आणि प्रकृती अस्वास्थ्य ! २५

६. प.पू. भक्तराज महाराज यांनी त्यांच्या निर्वाणाविषयी दिलेल्या पूर्वसूचना ! २७

७. प.पू. भक्तराज महाराज यांचे अनाकलनीय वागणे २९

८. श्री. घाणेकरांच्या मुलीच्या विवाहाच्या वेळी अनुभवलेली गुरुलीला! ३३

९. प.पू. भक्तराज महाराज यांची अखेरची भेट ३६

१०. प.पू. भक्तराज महाराज यांचे शेवटचे आजारपण ३८

११. प.पू. भक्तराज महाराज यांना काळाची चाहूल लागल्याचे एक उदाहरण ! ४१

१२. प.पू. भक्तराज महाराज यांचे कांदळी येथील अंत्यदर्शन ! ४२

१३. प.पू. भक्तराज महाराज यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी जाणवलेली सूत्रे ४४

१४. प.पू. भक्तराज महाराज यांच्या निर्वाणानंतरच्या वर्षभरातील घडामोडी ४५

१५. प.पू. भक्तराज महाराज यांचे देहत्यागानंतरही होत असलेले मार्गदर्शन ! ४८

१६. देहत्यागानंतरही भक्तांना सांभाळणारे प.पू. भक्तराज महाराज ! ५२

१७. अवलिया संत प.पू. उत्तमबाबा यांच्या माध्यमातून प.पू. भक्तराज महाराज यांनी दिलेला आशीर्वाद आणि प.पू. उत्तमबाबा यांची लक्षात आलेली सर्वज्ञता ! ५४

१८. उत्तम प्रकारे पार पडलेला अमेरिकेचा व्याख्यान दौरा ! ५७

१९. वर्ष १९९७, ९८ आणि ९९ च्या घडामोडी ६१

२०. सनातन संस्थेचे मुख्य कार्यालय गोवा येथे स्थलांतरित करण्याचा निर्णय आणि त्यानंतर गुरुकृपेने वाढत गेलेले कार्य ! ६४

## मनोगत

**१. प.पू. भक्तराज महाराज यांच्याविषयी भक्तांशी बोलतांना त्यांनी ‘कुंदाताईंची ‘गुरुगीता’ चालली आहे’, असे म्हणणे :** ‘एकदा इंदूर आश्रमातल्या गणेश सभागृहाच्या बाहेरच्या चौकात आम्ही बायका बोलत बसलो होतो. तेव्हा प.पू. भक्तराज महाराज (प.पू. बाबा) कुणाचा तरी हात धरून बाहेर चालले होते. आमच्या समोरून जाता जाता माझ्याकडे बघून ते म्हणाले, ‘‘कुंदाताईंची ‘गुरुगीता’ चालली आहे.’’ खरोखरच त्या वेळी मी त्या सगळ्यांशी प.पू. बाबांबद्दलच बोलत होते. तेव्हा ‘पुढे भविष्यात खरोखरच ‘गुरुगीता’ (अमृतमय गुरुगाथा) लिहायची वेळ येईल’, असे मला स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते.

**२. मुंबईच्या भक्तांशी बोलतांना प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्याविषयी आठवणी निघणे, भक्तांनी ‘हे सर्व लिहून काढा’, असे सांगणे अन् त्या वेळी ते फारसे मनावर न घेणे :** आमचा मुंबईचा जो गट आहे, तो कुठल्याही निमित्ताने एकत्र आला की, हमखास प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्या आठवणी निघायच्या. मी प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्याविषयी जे अनुभवले, त्याविषयी मी त्यांना बरेच काही सांगायचे. तेव्हा त्यातले काही जण मला म्हणायचे, ‘‘तुम्ही हे सगळे लिहून का काढत नाही ? सगळ्यांनाच त्याचा आनंद घेता येईल’’; पण तेव्हा मी ते फारसे मनावर घेतले नाही.

**३. गोव्याला आल्यावर डॉक्टरांशी बोलतांना प.पू. बाबांच्या आठवणी निघणे आणि त्यांनी ‘हा इतिहास असल्याने लिहून काढा’, असे सांगणे :** डॉक्टरांच्या आजारपणाच्या निमित्ताने दळणवळण बंदीच्या काळात मला गोव्याला यावे लागले. डॉक्टरांशी बोलतांना प.पू. बाबांच्या आठवणी निघायच्या. त्या वेळी मला जे आठवायचे, ते मी त्यांना सांगायचे. तेव्हा डॉक्टर मला म्हणायचे, ‘‘हा तर इतिहास आहे. हे सगळे लिहून काढा. आपल्या अध्यात्माच्या मार्गावरील वाटचालीबद्दलही लिहा.’’

**४. सगळे प्रसंग सलग आठवत नसल्याने साधनेच्या वाटचालीविषयी लिहिणे अवघड वाटणे, प.पू. बाबांना शरण जाऊन प्रार्थना केल्यावर ३० – ३५ वर्षांतला सगळा घटनाक्रम आठवू लागणे आणि प.पू. बाबांनीच ‘गुरुगीता’ लिहून घेतल्याचे जाणवणे :** मला हे थोडेसे अवघड काम वाटले; कारण वाटचालीबद्दल लिहायचे, तर सगळे प्रसंग सलग आठवले पाहिजेत. मला मधले मधले प्रसंगच आठवायचे. शेवटी मी प.पू. बाबांनाच शरण गेले आणि त्यांना विनंती केली, ‘तुम्हीच मला सगळी आठवण करून द्या.’ आश्चर्य म्हणजे मला मागच्या ३० – ३५ वर्षांतला सगळा घटनाक्रम आठवू लागला. शेवटी प.पू. बाबांनी माझ्याकडून ‘गुरुगीता’ लिहून घेतली. मी काही साहित्यिक नाही. ‘बोलवितो मज नंदाचा नंदन’ या भावाने माझ्याकडून हे लिखाण झाले आहे. तरी ते गोड मानून घ्या. ‘चांगले आहे, ते माझ्या गुरूंचे आहे आणि चुका झाल्या असतील, तर त्या माझ्या आहेत’, असे समजून वाचन करा. लिखाणात काही त्रुटी असू शकतील. त्याबद्दल क्षमस्व !

**५. प.पू. बाबांच्या आठवणीची ही भेट कृतज्ञताभावाने प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्या चरणी अर्पण ! :** प.पू. बाबांच्या लीला अगाध आणि अमाप आहेत. त्यांतले माझ्या हाताला लागलेले अल्पसे कण मी वेचले आणि आपल्यापुढे सादर केले. माझ्यासाठी जे प्रेरणादायी ठरले, ते इतरांनाही मिळावे; म्हणून हा छोटासा प्रयत्न! ही छोटीशी भेट कृतज्ञताभावाने प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्या चरणी अर्पण करते. ‘प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांचे प्रेम आणि कृपाशीर्वाद आम्हा दोघांना, त्यांचे सगळे शिष्य, भक्त आणि साधक यांना मिळो’, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!’

**– डॉ. (सौ.) कुंदा जयंत आठवले, गोवा (३.१२.२०२०)**

**आम्ही जीव घेतो आणि प्राण देतो. – प.पू. भक्तराज महाराज**